## मी कशाला आसवांना हाक देऊ?

मी कशाला आसवांना हाक देऊ?
अन् पुराण्या वेदनांना राख देऊ? ।१
चालताना आठवे का वाट माझी
चुकत जाता पावलां का धाक देऊ? ।२
ही जवानी साथ देते कामनांना
पण तरी सद्भावनेची भाक देऊ? ।३
वाटले होते या मनाला दुःख थोडे
पीळ भरल्या यामना का बाक देऊ ।४
सागरा तू थांब थोडा या किनारी
लाट येता भावनांना पाक देऊ।५

**-- प्रकाश रामचंद्र क्षीरसागर, गोवा**